**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

**निवडणूक तात्काळ**

क्रमांक - रानिआ/ जिपपंस/२०११/प्र.क्र. १९/का.७
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ०६/०२/२०१२.

प्रति,
डॉ. पी. एस. मीना,
प्रधान सचिव,
(प्र. सु.र.व का. व विमान चालन)
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

विषय :- जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०१२
शासकीय कर्मचाऱ्यांना मतदान करता येणे शक्य व्हावे याकरिता
कार्यालयीन वेळेत सूट देणेबाबत..

आदरणीय महोदय,

राज्यातील २७ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत असलेल्या पंचायत समित्यांच्या निवडणुकीचे मतदान दि. ७/२/२०१२ रोजी घेण्यात येणार आहे. यामध्ये मुंबईच्या आसपासच्या ठाणे, रायगड, पुणे या जिल्ह्यातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचाही समावेश आहे. या क्षेत्रात वास्तव्यास असलेले बरेचसे मतदार हे मुंबई शहर व मुंबई उपनगरातील शासकीय कार्यालयांमध्ये कार्यरत आहेत. या मतदारांना मतदान करता येणे शक्य व्हावे यादृष्टीने **अशा कर्मचाऱ्यांना दि. ७/२/२०१२ रोजी कार्यालयात अर्धा दिवस उशिरा येण्याची किंवा मध्यान्हानंतर कार्यालय सोडण्याची सवलत देण्यात यावी** असे आपणास मा. राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार कळविण्यात येत आहे.

आपला,

( डॉ. अ. द. कोल्हे )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत - कक्ष अधिकारी, का. २९, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना आवश्यक त्या सत्वर कार्यवाहीसाठी अग्रेषित.

D:\Letter for Code of Conduct. Punedoc.doc/D.O.7